# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

फोन नं.(०२०) २६०५०६४१ ई-मेल आयडी :- sceapune@gmail.com


<u>निवडणूक महत्वाचे</u>

जा.क्र. रासनिप्रा/संस्था समिती गठण/परिपत्रक/ ८८१ /१५
दिनांक २३/०१/२०१५

वाचावे:-

१.महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ अअअ (५)

२. महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ चे नियम ६४.

**-:परिपत्रक:-**

**विषय :- ज्या संस्थांच्या निवडणूक प्रक्रियेत २/३ पेक्षा कमी समिती सदस्य निवडून आले आहेत,अशा समिती सदस्यांचे गठण करणेबाबत.**

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने निवडणूकीस पात्र सहकारी संस्थांची निवडणूक प्रक्रिया तात्काळ प्रभावाने सुरू करण्याचे आदेश निर्गमित केलेले आहेत. त्यानुसार राज्यात निवडणूक प्रक्रिया सुरू झालेल्या आहेत. ज्या सहकारी संस्थांच्या निवडणूक प्रक्रिया पूर्ण झालेल्या अशा सहकारी संस्थांच्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी निवडणूक निकाल जाहिर करुन निबंधक कार्यालयास सादर केलेला आहे. ज्या संस्थांच्या निवडणूक पक्रियेत २/३ पेक्षा कमी समितीसदस्य निवडून आलेले आहेत, अशा समिती सदस्यांचे गठण करावे किंवा कसे ? याबाबतचे प्राधिकरणांस मार्गदर्शन करणेबाबत विनंती केलेली आहे.

समिती सदस्यांचे गठण करणेबाबत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ अअअ (५) मध्ये स्पष्ट तरतूद नमुद केलेली आहे. सदर तरतूदीनुसार निवडणूक प्रक्रियेत २/३ पेक्षा जास्त समिती सदस्य निवडून आल्यास त्याबाबतचा अहवाल निबंधकाकडे सादर करावयाचा असून निबंधकाने समितीची रचना करणेसाठी अहवालातील समिती सदस्यांची नावे त्यांच्या पत्यासह प्रसिध्द करणे क्रमप्राप्त आहे. तर ज्या सहकारी संस्थांच्या एकूण समिती सदस्यांपैकी २/३ पेक्षा कमी समिती सदस्य निवडून आल्यास समिती कलम ७३ (अअअ) (५) अन्वये समितीची रचना निबंधकास करता येणार नाही.

तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडूणक) नियम २०१४ चे नियम ६४ नुसार संस्थेची निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी यांनी निवडणूक निकाल ई-९ किंवा ई १७ मध्ये घोषित करावयाचा आहे. तथापि निवडणूक निकाल घोषित करणे आणि निबंधकाने समितीची रचना कलम ७३ (अअअ) (५) अन्वये करणे याबाबी स्वतंत्र आहे. निबंधकाने कलम ७३(अअअ) (५) अन्वये कृती केल्यावर समितीची रचना झाली असल्याचे समजण्यात यावे. ज्या संस्थेचे निवडणूकीत २/३ पेक्षा कमी समिती सदस्य निर्वाचित होतील तेथे निबंधकाने कायद्यातील तरतूदीनुसार उचित कार्यवाही करणे अभिप्रेत आहे.

**मा.आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, पुणे यांचे मान्यतेने**

**(डॉ. आनंद जोगदंड)**
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**प्रति,**

१. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व)

२. तालुका / प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व)

**प्रत माहीतीस्तव,**

विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था (सर्व)